महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक आयुक्तालय

हज हाऊस, छत्रपती संभाजी नगर

ई-मेल:minoritycommissionerate@gmail.com  दूरध्वनी क्र. : ०२४० २९९२८८५

दिनांक : १४/०८/२०२६

क्रमांक: सेकनी-२०२६/प्र.क्र. ०७/आस्था

प्रती,

कक्ष अधिकारी(का-०१),

अल्पसंख्याक विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय : अल्पसंख्याक आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर येथील आस्थापनेवरील रिक्त पदे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून करार पद्धतीने भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई १५२५/प्र.क्र. ३७/आस्थामां (का.१३), दिनांक १० जून, २०२५.

२. सह सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांचे पत्र दिनांक २०/०५/२०२६.

३. महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय अविवि २०२६/प्र.क्र.१२४ /का.१ दिनांक: ७ ऑगस्ट, २०२६.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, नव्याने स्थापन झालेल्या अल्पसंख्याक आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर या राज्यस्तरीय कार्यालयाचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्यासाठी व विविध शासकीय कल्याणकारी योजनांची वेळेत व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरणे अत्यंत आवश्यक आहे. सदर रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी यापूर्वी संवर्ग नियंत्रण प्राधिकरणांकडे अनेक शिफारस प्रस्ताव पाठवून सतत प्रयत्न करण्यात आले, तथापि इतर विभागांतून अधिकारी उपलब्ध न झाल्यामुळे महत्त्वाची पदे अद्याप रिक्तच आहेत.

२.	त्याअनुषंगाने, संदर्भ क्र. २ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या सुधारित शासन निर्णय दिनांक १० जून, २०२५ मधील तरतुदींनुसार, कार्यालयाच्या मंजूर आकृतीबंधातील एकूण ३६ पदांच्या कमाल १०% मर्यादेत (म्हणजेच एकूण ३ पदे) सेवानिवृत्त शासकीय/निमशासकीय अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने घेण्यास आयुक्तालयास मंजुरी मिळालेली आहे. सदर मर्यादेच्या अधीन राहून या कार्यालयातील खालील ३ पदे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून करार पद्धतीने भरण्याचे प्रस्तावित आहे:

**१) कार्यकारी अभियंता (वेतनस्तर S-23) - १ पद**

**२) सहायक लेखा अधिकारी (वेतनस्तर S-15) - १ पद**

**३) सहायक संशोधन अधिकारी (वेतनस्तर S-14) - १ पद**

३.	शासन निर्णयातील तरतुदीनुसार, सदर पदे करार पद्धतीने भरण्यासाठी वृत्तपत्रात आणि विभागाच्या व आयुक्तालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर पारदर्शक जाहिरात प्रसिद्ध करून पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविणे अनिवार्य आहे. त्याकरिता संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची सविस्तर जाहिरात, सविस्तर अटी व शर्ती आणि अर्जाचा नमुना या पत्रासोबत सहपत्र म्हणून जोडला आहे.तरी आपल्या स्तरावरून हि जाहिरात विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(कै.दा.खेडेकर)
अधीक्षक,अल्पसंख्याक आयुक्तालया,
छत्रपती संभाजीनगर.

**सोबत:** जाहिरातीचा मसुदा

# महाराष्ट्र शासन

## अल्पसंख्याक आयुक्तालया, हज हाउस, किले अर्क, छत्रपती संभाजीनगर

### करार पद्धतीने मानधन तत्वावर सेवा निवृत्त कार्यकारी अभियंता,सहायक संशोधन अधिकारी, सहायक लेखाधिकारी यांच्या सेवा उपलब्धतेसाठी जाहिरात.

सेवानिवृत्त **कार्यकारी अभियंता, सहायक संशोधन अधिकारी व सहायक लेखाधिकारी** या पदाकरिता करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबत शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांची अल्पसंख्याक आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजीनगर येथे एक वर्षाच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. सिबिई १५२५/ प्र.क्र. ३७/आस्थाम (का.१३) दिनांक १०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | १ |
| २ | सहायक संशोधन अधिकारी | १ |
| ३ | सहायक लेखाधिकारी | १ |
| | एकूण | ३ |

करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबतच्या अर्जाचा नमुना आणि अटी व शर्ती शासनाच्या https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ०४/०९/२०२६ असा आहे.

स्वाक्षरी/-

( प्रतिभा स. इंगळे.)

मा. आयुक्त, अल्पसंख्याक आयुक्तालय,

छत्रपती संभाजीनगर.

१. करार पद्धतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती:

१.अर्जदार संबंधित पदावरून (कार्यकारी अभियंता / सहायक संशोधन अधिकारी / सहायक लेखा अधिकारी) किंवा समकक्ष शासकीय पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

२. अर्जदारास संबंधित तांत्रिक / सांख्यिकी / लेखा व वित्तीय कामकाजाचा अनुभव आणि संगणक हाताळण्याचे (उदा. MS Office, Internet, शासकीय संगणक प्रणाल्या) पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३. अर्जदारास मराठी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

४. अर्जदाराचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे .

५. अर्जदार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने पूर्णपणे सक्षम असावा, तसेच तो निर्व्यसनी असावा .

६. अर्जदाराविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी, तसेच फौजदारी किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे गुन्हे दाखल नसावेत. शासकीय सेवेच्या संपूर्ण कालावधीत गंभीर शिक्षेची नोंद झालेली नसावी .

७. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज सर्व कागदपत्रांसह अंतिम दिनांकापूर्वीच सादर करावा. अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे किंवा बदल करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना (आयुक्त) राहतील .

८. प्राप्त अर्जांची छाननी करून केवळ पात्र उमेदवारांची मुलाखत घेऊन गुणवत्ता व कामाच्या अनुभवाच्या आधारे नामिकासूची (Panel) तयार केली जाईल. उमेदवार निवडीबाबतचा अंतिम निर्णय पूर्णपणे विभाग प्रमुखांचा राहील.

९. सदर नियुक्ती प्रथम एक वर्षाच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्त्वावर करण्यात येईल. कार्यालयाची गरज व उमेदवाराचे कामकाज समाधानकारक असल्यास, वयोमर्यादेच्या अधीन राहून दरवर्षी मुदतवाढ (नूतनीकरण) देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना राहतील. मात्र, करार नियुक्तीचा एकूण कालावधी ३ वर्षांपेक्षा जास्त असणार नाही.

१०. सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी स्वरूपाची असल्याने, उमेदवाराला शासकीय सेवेच्या कोणत्याही संवर्गात नियमित सामावून घेण्याचा किंवा नियमित शासकीय सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क असणार नाही.

११. करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीत सोपवलेली सर्व तांत्रिक, प्रशासकीय व वित्तीय कामे निश्चित वेळेत आणि संपूर्ण अचूकतेसह पूर्ण करण्याची कायदेशीर जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील .

१२. करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीत सोपवलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही खाजगी, व्यावसायिक, भागीदारी किंवा इतर नोकरी विषयक कामात गुंतता येणार नाही.

१३. सोपविलेल्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेऊन आयुक्त यांच्याकडून नियमित मूल्यमापन करण्यात येईल. काम समाधानकारक नसल्याचे आढळल्यास करार मुदतीपूर्वी संपविण्यात येईल.

१४. कामकाजादरम्यान प्राप्त होणारी सर्व शासकीय कागदपत्रे, माहिती व आधार सामग्रीबाबत गोपनीयता पाळणे पूर्णपणे बंधनकारक राहील. कोणत्याही स्वरूपाच्या शासकीय माहिती गळतीस संबंधित उमेदवार कायदेशीररित्या सर्वस्वी जबाबदार राहील.

१५. नियुक्ती प्राधिकारी (आयुक्त) यांना कोणत्याही वेळी, कोणतीही आगाऊ सूचना न देता अथवा कोणतेही कारण न दर्शवता करार पद्धतीवरील सेवा तात्काळ समाप्त करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्यासाठी कारणे देण्याचे नियुक्ती प्राधिकाऱ्यावर बंधनकारक राहणार नाही.

१६. निवड झालेल्या उमेदवाराला नॉन-ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यातील बंधपत्र व हमीपत्र कार्यालयाला सादर करणे बंधनकारक राहील.

१७. नियमित कार्यालयीन वेळ पाळावी लागेल. तसेच कामाच्या आणीबाणीच्या प्रसंगी किंवा शासकीय गरजेनुसार सुट्टीच्या दिवशी देखील कार्यालयात उपस्थित राहून काम पूर्ण करावे लागेल, ज्यासाठी कोणताही अतिरिक्त मोबदला किंवा रजा देय होणार नाही.

१८. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या (मा. आयुक्त) पूर्वपरवानगीशिवाय किंवा लेखी मंजुरीशिवाय करार पद्धतीवरील अधिकाऱ्याला आपले मुख्यालय सोडता येणार नाही.

१९. करार पद्धतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्याला कोणत्याही प्रकारचे स्वतंत्र वित्तीय अधिकार, मंजुरी अधिकार, किंवा शासकीय दस्तऐवजांवर स्वाक्षरीचे अंतिम प्रशासकीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

**२०. मासिक पारिश्रमिक:-**

- (क) शासकीय/निमशासकीय सेवा- सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहित कार्यपद्धतीचे पालन करून करार पद्धतीने नेमणूक करताना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मूल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मानसिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.
- (ख) निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा - ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पद्धतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानिव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करून त्या आधारे त्यांचे मानसिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

२१. इतर सर्व भत्ते हे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णया नुसार लागू राहतील.

२२. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार हक्क नसेल.

२३. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णय क्र. सीबीई १५२५/प्र.क्र. ३७/आस्थामां (का.१३) मधील सर्व अटी व शर्ती संबंधित उमेदवारावर बंधनकारक राहतील.

## २. अर्ज सादर करण्याची पद्धत व निवड प्रक्रिया

इच्छुक पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज पूर्णपणे भरून त्यासोबत खालील कागदपत्रांच्या स्वाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे:

1. निवृत्तीवेतन आदेश ची प्रत.

२.सेवानिवृत्तीचे अधिकृत आदेश / कार्यमुक्तता आदेश प्रत.

३.शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे दाखले/प्रमाणपत्रे.

४.चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे व कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र.

५.इतर संबंधित कागदपत्र.

**३. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख: दिनांक ०४ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत.**

**४. अर्ज कुठे सादर करावा:** अल्पसंख्याक आयुक्तालय, हज हाऊस इमारत, शाही मस्जिद रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१.

अर्ज समक्ष, नोंदणीकृत टपालाने किंवा ईमेलद्वारे minoritycommissionerate@gmail.com या मेल आयडी वर पाठविणे आवश्यक आहे. लिफाफ्यावर "करार पद्धतीने नियुक्तीसाठी अर्ज - [पदाचे नाव]" असा स्पष्ट उल्लेख असावा.

**५. निवड पद्धत:** प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक कळवला जाईल. मुलाखतीमधील कामगिरी व अनुभवाच्या आधारे उमेदवारची निवडीबाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा राहील.

फोटो

# अर्जाचा नमुना

## करार पद्धतीने नियुक्तीसाठी अर्ज

(शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. सिबिई १५२५/ प्र.क्र. ३७/आस्थाम

(का.१३) दिनांक १०/०६/२०२५ )

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव : ________________________________

२. अर्जदाराचा पत्ता : ________________________________

________________________________

________________________________

________________________________

३.लिंग : पुरुष / महिला

४.अवगत भाषा

५. भ्रमणध्वनी क्रमांक : ________________________________

६.ईमेल : ________________________________

७. जन्म दिनांक व वय : ________________________________

८. नियुक्तीसाठी आवश्यक

असलेली अर्हता आहे काय ? : ________________________________

९.विभागीय चौकशी चालू अथवा

प्रस्तावित आहे किंवा कसे ? : ________________________________

१०. अनुभव : सोबत तपशील देत आहे.

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नावे | कालावधी | कामाचे स्वरूप/विषय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

"__________________" या पदावर करार पद्धतीने नियुक्तीबाबतची जाहिरात / अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचल्या असून करार पद्धतीने नियुक्तीबाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, वरील सर्व माहिती सत्य असून सदर माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कार्यवाहीस मी जबाबदार राहीन याची मला जाणीव आहे.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

नाव : ______________________________

सेवानिवृत्त दिनांक:________________